MHNG160010602020

Cri.M.A./201/2020

Dipali Nasib Gundhi Vs. Nasib Chhotu Gundhi and 4

## निशाणी क्र. ४ खाली आदेश

(पारीत दिनांक ०४/०८/२०२१)

१) प्रस्तुत अर्ज अर्जदार दिपाली हिने कलम २३ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अंतर्गत कलम १७, १८ व १९ मध्ये नमुद असलेले संरक्षणात्मक आदेश, निवासाचा आदेश व अंतरिम खावटी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) अर्जदाराने तिच्या अर्जात नमुद केले की, गैरअर्जदार याने तिचे पालनपोषण करण्याकडे दुर्लक्ष केले आहे. तसेच तिचा छळ करून तिला तिचे आई वडीलांचे दयेवर राहण्यास सोडून दिले आहे. तिचेकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार हा बॅंकेमध्ये व्यवस्थापक या पदावर असून दरमाह ५०,०००/- रूपये कमवतो. तसेच गैरअर्जदार क्र.२ ते ५ यांचा कौटूंबिक व्यवसाय असून त्या पासून ते दरमाह ३,००,०००/- रूपये कमवतात. तसेच त्यांचेकडे वडीलोपार्जित घर व शेती असून त्या पासून त्यांना दरमाह ५,००,०००/- रूपयांचे उत्पन्न मिळते. अर्जदाराला तिच्या पालन पोषणासाठी दरमाह २५०००/- रूपये व तिचे नवजात मुलीचे पालन पोषणासाठी दरमाह १०,०००/- रूपये रकमेची आवश्यकता आहे. तसेच गैरअर्जदार यांचे राहणीमान याचा विचार करून तिला दर माह २५,०००/- रूपये घरभाडे मिळावे अशी तिने विनंती केली आहे. तसेच न्यायालयात हजर होण्यासाठी प्रत्येक तारखेवर

खाजगी वाहनाने येण्याकरीता १,०००/- रूपये व वकीलांचे फी साठी ८०,०००/- रूपयाची मागणी तिने प्रस्तुत अर्जाव्दारे केली आहे.

३) गैरअर्जदार नसिब याने अर्जदाराचे प्रस्तुत अर्जास व मुख्य अर्जास एकत्रित उत्तर नि.क्र.९ येथे दाखल केले आहे. गैरअर्जदार याचे म्हणणे असे की लग्नानंतर सुरूवातीचे काही दिवस अर्जदार चांगली वागली. परंतु त्यानंतर तिने सकाळी १०.०० ते ११.०० वाजता उठण्याची सवय लावून घेतली व ती घरातील कामे करीत नसे. ती गैरअर्जदार नसीब याचेपेक्षा ५ वर्षाने मोठी असून तिचे वय ३० वर्षे असे आहे. सदर बाब तिने लग्नाचेवेळी लपवून ठेवली होती. तो अर्जदारावर प्रेम करत असल्याने त्याने अर्जदाराचे उध्दट वागणे सहन केले. तरी देखील तो तिला वागवण्यास तयार आहे. त्याने मान्य केले की लग्नानंतर तो अर्जदार हिचेसोबत लक्ष्मी नारायण कॉलोनी, रिंग रोड खरबी नागपूर येथील प्लॉट क्र.६२ येथे राहला. त्याचे पुढे असे म्हणणे आहे की अर्जदार ही त्याचेसोबत उध्दट व अपमानजनक भाषेमध्ये बोलत असे व नेहमी तिची बहीण व बहीणजावई यांचेसोबत फोनवर बोलून त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्याला त्रास देत असे. लग्नानंतर अर्जदार त्याचे घरी राहावयास आल्यानंतर त्याने अर्जदारास नेहमीच चांगले वागवले. परंतु अर्जदार कोणतेही कारण नसतांना त्याचे सोबत भांडण करत असे. दिनांक २२.०७.२०२० रोजी कोणतेही कारण नसतांना अर्जदार ही तिचे वडील, आई, भाउ व बहिण यांचेसोबत त्याला न सांगता माहेरी निघून गेली. त्याने अर्जदाराला परत आणण्याचा प्रयत्न केला परंतु अर्जदाराने तिचे आई-वडीलांचे सांगण्यावरून परत येण्यास नकार दिला. लग्ना आधीच अर्जदार व गैरअर्जदार यांचेत प्रेम होते व अर्जदार ही त्याचे घरी लग्ना आधीच येवून गेलेली होती. त्यामुळे ती गैरअर्जदाराचे कुटूंबातील व्यक्तिंना आधी पासूनच ओळखत होती. अर्जदार व त्याचे लग्न हे कुटूंबातील सदस्यांच्या सहमतीने त्यांचे एकमेकांवर प्रेम

असल्याने झाले होते. अर्जदाराने तिचे अर्जात कथन केल्याप्रमाणे कोणतेही सोन्याचे दागीने व इतर वस्तू दिल्या नव्हत्या. या उलट अर्जदार हिने गैरअर्जदार क्र.३ हिचे आलमारीचे कुलूप तोडून २५ तोळे सोने व १,२५,०००/- रूपये नगदी माहेरी जातांना घेवून गेली. त्यामुळे गैरअर्जदाराने अर्जदाराविरूध्द वाठोडा पो.स्टे. नागपूर येथे तक्रार देखील दाखल केली. अर्जदार ही गैरअर्जदाराचे जातीवर नेहमी निंदावाचक शब्द बोलून तो खालच्या जातीचा आहे असे म्हणत असे व गोसावी हे भिकारी आहेत असे म्हणत असे. गैरअर्जदाराचे जातीसंबंधी अर्जदारास लग्नाआधीपासूनच माहिती असून देखील ती त्याला जातीवरून हिनवत असे. अर्जदार ही तेली समाजाची असून गैरअर्जदार हा गोसावी समाजाचा आहे. ती भांडखोर स्वभावाची असून नेहमी त्याला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत असे व आठवडयातून एकदा तिचे आई वडील व बहिणीस भेटण्यास उमरेड येथे जात असे.अर्जदार दिपाली हि गैरअर्जदार नसिब याचेपेक्षा जास्त शिकलेली असल्याने ति त्याचेवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत असे. गैरअर्जदार नसिब याचे अर्जदार दिपाली व त्याची नवजात मुलगी यांचेवर अपार प्रेम आहे. परंतु त्याचे मुलीचे जन्मानंतर अर्जदार दिपाली व तिचे आई-वडीलांनी त्याला त्याचे मुलीस भेटु दिले नाही. अर्जदार दिपाली हि त्याला नेहमीच ऐशोआरामाच्या वस्तुंची मागणी करत असे व त्याने ति मागणी पुर्ण न केल्यास त्याचे सोबत भांडण करत असे. दिनांक २२.०७.२०२० रोजी अर्जदाराचे वडीलांनी त्याला शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. त्यामुळे गैरअर्जदार याने पोलीस स्टेशन मौदा येथे तक्रार दाखल केली. अर्जदार हिने ति गर्भवती असतांना गैरअर्जदार याचे संमतीविना त्याचे घर सोडुन गेल्याने त्याने पोलीस स्टेशन मौदा येथे तक्रार दिली होती. दिनांक ११.०८.२०२० रोजी अर्जदार दिपाली हिला बाळंतपणासाठी उमरेड येथील दवाखाण्यात भरती केल्याचे व तिला मुलगी झाल्याचे माहीत झाल्याने तो पाहण्यास गेला असता अर्जदार हिने त्याला त्याचे मुलीस पाहु दिले

नाही.

गैरअर्जदार नसिब हा बॅकेत व्यवस्थापक या पदावर नोकरीस नाही व अर्जदाराने नमुद केल्याप्रमाणेचे गैरअर्जदार क्र.२ व ३ यांचे आयुर्वेदिक ट्टिमेंट सेंटर नाही. गैरअर्जदार नसिब हा बेरोजगार असुन त्याचेकडे उत्पन्नाचे साधन नसल्याने तो अर्जदाराच्या ऐशोआरामाच्या वस्तुंची मागणी पुर्ण करू शकत नाही. त्यामुळे ति त्याचेसोबत अर्वाच्य भाषेत भांडन करत असे. अर्जदार दिपाली हि शिक्षीत असुन अभियांत्रीकीची पदवी प्राप्त आहे. गैरअर्जदार तिचे पेक्षा कमी शिकला असल्याने अर्जदार त्याचे सोबत राहु ईच्छीत नाही. तो अर्जदारास वागविण्यास तयार असुन त्याचे घरातिल वेगळया खोलीत ठेवण्यास तयार आहे. अर्जदार स्वत:हुन घर सोडुन गेल्याने अर्जदाराचा सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्याने केली.

४) अर्जातील कथन, अभिलेखावरील दस्तऐवज आणि अर्जदार व गैरअर्जदारांचे विद्वान अधिवक्त्यांची सुनावणी ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले व त्यावर माझे निष्कर्ष खालील कारणेमिमांसेच्या आधारे देत आहे.

| मुददे | निष्कर्ष |
|---|---|
| १) अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे अर्जावरून प्रथमदर्शनी दिसून येते काय? | होय. |
| २) अर्जदार तात्पुरती खावटी मिळण्यास हकदार आहे काय? | होय. |
| ३) अर्जदार तात्पुरता निवासाचा आदेश किंवा घरभाडे मिळण्यास हकदार आहे काय ? | होय. |

| | | |
|---|---|---|
| ४) | अर्जदार तात्पुरता सौंरक्षण आदेश मिळण्यास हकदार आहे काय ? | होय. |
| ५) | अर्जदार प्रवासखर्च व वकीलांचे शुल्क मिळण्यास हकदार आहे काय ? | नाही. |
| ६) | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणेमिमांसा

**मुददा क्र.१ ची कारणे :**

५) प्रस्तुत प्रकरणात अर्जदार यांनी काही कागदपत्र अभिलेखपटावर दाखल केले त्याबददल संयुक्तिक वेळी भाष्य केले जाईल.

६) अर्जदाराने दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले तसेच अर्जदार व गैरअर्जदारांचे विद्वान अधिवक्ता यांचे म्हणणे ऐकले. अर्जदार दिपाली ही गैरअर्जदार नसिब यांची वैवाहिक पत्नी असल्याबाबत दोन्ही पक्षात वाद नाही. दोन्ही पक्षाच्या कथनावरून आणि अर्जदार हिने दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरून प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अर्जदार दिपाली ही गैरअर्जदारांपासून वेगळी राहात आहे. निश्चितच उभयतांमध्ये वाद निर्माण झाल्यामुळे ते सोबत न राहता वेगळे राहुन न्यायालयाचा मार्ग अंगिकारलेला आहे. अर्जदार दिपाली हिने दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, तिने तिचे वकीलांमार्फत गैरअर्जदार याला दिनांक ०४.०८.२०२० रोजी नोटीस पाठविली आहे. तसेच अर्जदाराचे वडीलाने दिनांक १३.०९.२०२० रोजी गैरअर्जदार नसिब व इतर यांचेविरूध्द पोलीस स्टेशन मौदा येथे तक्रार दाखल केली आहे व सदर तक्रारीवर कार्यवाही न झाल्याने दिनांक २०.०९.२०२० रोजी पोलीस अधिक्षक नागपुर यांचेकडे तक्रार दिली आहे.

७) दोन्ही पक्षांच्या कथनाचे व अर्जदाराने दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार दिपाली ही गैरअर्जदार नसिब यांच्यापासून वेगळी राहत आहे व तीचे जीवन जगत आहे. त्यामुळे अर्थातच अर्जदार व्यथीत व्यक्ती आणि गैरअर्जदार जबाबदार यांच्या परीभाषेत मोडतात. लग्न झाल्यानंतर स्त्रीला तिचा पती हाच सर्वस्व असतो. अशा परिस्थितीमध्ये अर्जदार ही तिच्या पतीसोबत संसार करणे हे कायदेशीर व सामाजिक दृष्टीने योग्य आहे. परंतु जर असे झाले नाही आणि पत्नीला आपले वेगळे जीवन व्यथित करावे लागत असेल तर निश्चितच तो कौटुंबिक हिंसाचार होईल. सदर केसमध्ये अर्जदार ही आज रोजी तीच्या माहेरी राहत आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांनी एकमेकावर केलेले आरोप या क्षणी पुराव्याअभावी ग्राहय धरता येणार नाही. परंतु अर्जदार व गैरअर्जदार यांच्या वैवाहीक जीवनावरून व सध्या स्थितीत दोन्ही पक्ष जगत असलेल्या परिस्थितीवरून हे निश्चितच म्हणता येईल की, गैरअर्जदार नसिब याने अर्जदार दिपाली हिचेकडे दुर्लक्ष केलेले आहे. तसेच अर्जदार दिपाली ही गैरअर्जदार यांच्याशी कौटुंबिक संबंधात असून कलम ३ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अर्जातील नमुद कारणास्तव अर्जदार दिपाली हीच्यावर प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे दिसून येते. म्हणून मुददा क्र.१ यास होकारार्थी निष्कर्ष दिला आहे.

**<u>मुददा क्र.२ ची कारणे</u> :**

८) अर्जदार दिपाली ही गैरअर्जदार नसिब याची विवाहीत पत्नी आहे. जवळपास २२.०७.२०२० पासून अर्जदार दिपाली तिच्या नवजात मुलीसह गैरअर्जदार नसिब याच्यापासुन वेगळी जीवन व्यथीत आहे. पती या नात्याने गैरअर्जदार याने मासिक खावटी अर्जदार व तिचे मुलीस पुरविणे ही त्याची नैतिक व कायदेशिर जबाबदारी आहे. अर्जदार दिपाली हीने गैरअर्जदार नसिब

हा बॅकेमध्ये व्यवस्थापक पदावर नोकरीस असुन दरमहा ५०,०००/- रूपये कमवत असल्याचे म्हणने आहे. परंतु गैरअर्जदार कोणत्या बॅकेत नोकरीस आहे याबाबत तिने तिचे अर्जात काहीही नमुद केलेले नाही. तसेच त्याचे पगारासंबंधीत कोणताही दस्त प्रकरणात दाखल केलेला नाही. गैरअर्जदाराने तो बॅकेत नोकरीस असल्याचे नाकारले असुन तो बेरोजगार असल्याचे कथन केले आहे. अर्जदार यांचे वकीलांनी युक्तीवाद केला की, गैरअर्जदार यांचे उत्पन्न सिध्द करण्याचा सिध्दीभार (इनतकमद र्वि चतवववि) अर्जदारावर नसुन गैरअर्जदार याचेवर आहे. त्यांचे कथनाचे पुष्ठ्यर्थ अर्जदार यांचे विव्दान वकीलांनी मा. सर्वोच्च न्यायालयाचे ***राजनेश -वि- नेहा (क्रिमीनल अपील क्र. ७३०/२०२० न्यायनिर्णय दिनांक ०४.११.२०२०)*** या न्यायनिर्णयातील परीच्छेद क्र. ९४ वर आपली भिस्त ठेवली. सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर न्यायनिर्णयात सुदृढ शरीरयष्टी असणारा पती हा त्याची पत्नी व मुले यांचे पालणपोषन करण्याकरीता कमविण्यास सक्षम असल्याचे गृहीत धरावे व तो त्याचे परीवाराचे पालणपोषन करण्यास असमर्थ आहे असा बचाव घेउ शकत नाही, परीवाराचे पालनपोषन करण्याची कायदेशीर जबाबदारी त्याचे आवाक्याबाहेर असलेल्या कारणांमुळे पार पाडु शकत नाही हे आवश्यक घटकांव्दारे सिध्द करण्याची जबाबदारी (वदने) पतीवर आहे असे नमुद आहे.

९) प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार नसिब हा २८ वर्ष वयाचा सुदृढ तरूण असल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जदाराचे वकीलांनी आपली भिस्त ठेवलेल्या वर नमुद मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ***राजनेश -वि- नेहा*** या प्रकरणाच्या न्यायनिर्णयात नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदार नसिब हा २८ वर्ष वयाचा सुदृढ तरूण असल्याने तो त्याची पत्नी व मुलगी याचे पालणपोषन करण्याकरीता कमविण्यास सक्षम आहे असे गृहीत धरावे लागेल. परंतु अर्जदार

दिपाली हिने तिचे अर्जात नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदार नसिब याचे दरमहा ५०,०००/- रूपये उत्पन्न असल्याचे गृहीत धरता येणार नाही कारण अर्जदार हिने प्रकरणात गैरअर्जदार नसिब हा कोणत्या बॅकेत नोकरीस आहे याबाबत काहीही नमुद केलेले नाही व त्याचे पगाराबाबत कोणताही दस्त दाखल केलेला नाही. निश्चीतच गैरअर्जदार नसिब याचे अर्जदाराने कथन केल्याप्रमाणे दरमहा ५०,०००/- रूपये उत्पन्न असल्याचे दस्त अर्जदाराने दाखल केले असते आणी तरी देखील गैरअर्जदार नसिब याने तो कायद्याने त्याचेवर अर्जदार व त्याचे मुलीची पालनपोषन करण्याची दिलेली जबाबदारी त्याचे आवाक्याबाहेरील परीस्थीतीमुळे पुर्ण करू शकत नाही असे म्हणने असते तर ते सिध्द करण्याची जबाबदारी (वदने) गैरअर्जदार नसिब याची राहली असती. परंतु अर्जदार दिपाली हिनेच तिचेवर गैरअर्जदार याचे दरमहा ५०,०००/- रूपये उत्पन्न असल्याचा सिध्दभार (इनतकमद वि चतववि) पुर्ण न केल्याने गैरअर्जदार नसिब याचेवर ते सिध्द करण्याची जबाबदारी (वदने) देता येत नाही. सबब गैरअर्जदार नसिब याचे अर्जदार दिपाली हिने कथन केल्याप्रमाणे दरमहा ५०,०००/- रूपये उत्पन्न असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही.

१०) अर्जदाराचे विव्दान वकीलांनी त्यांची भिस्त ठेवलेल्या वर नमुद ***राजनेश -वि- नेहा*** या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने अंतरीम पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेल्या अर्जासोबत अर्जदाराने सदर न्यायनिर्णयासोबत जोडलेल्या लागु असलेल्या मालमत्ता व दायीत्व दर्शविणारे नमुना १ किंवा २ मध्ये शपथपत्र दाखल करावे व त्यानंतर गैरअर्जदाराने चार आठवडयाचे आत त्याचा जबाब तसेच मालमत्ता व दायीत्व दर्शविणारे लागु असलेल्या नमुन्यात शपथपत्र दाखल करावे असे निर्देश दिले आहेत. परंतु प्रस्तुत प्रकरणात अर्जदार दिपाली व गैरअर्जदार नसिब यांनी असे कोणतेही शपथपत्र त्यांचे अर्ज व जबाबासोबत दाखल केलेले नाही. त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार यांचे

उत्पन्नासंबंधी कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर नाही.

११) वर नमुद विवेचनावरून गैरअर्जदार नसिब याचे अर्जदार दिपाली हिने कथन केल्याप्रमाणे दरमहा ५०,०००/- रूपये उत्पन्न असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नसले तरी तो त्याची पत्नी व मुलगी यांचे पालनपोषन करण्यासाठी कमाई करणेस सक्षम असल्याचे गृहीत धरता येईल. गैरअर्जदार नसिब याने तो बेरोजगार असल्याचे कथन केले आहे. गैरअर्जदाराचे सदर कथन विचारात घेतल्यास तो बेरोजगार असला तरी त्याचा चरीतार्थ चालविण्यासाठी कोणतीतरी खाजगी नोकरी किंवा मजुरीचे काम निश्चीतच करत असावा. आज रोजीच्या महागाईचा विचार करता व दोन्ही पक्षकारांच्या प्रथमदर्शनी राहनीमानाचा विचार करता गैरअर्जदार नसिब हा कमित कमी दरमहा १५,०००/- ते २०,०००/- रूपये पगाराने खाजगी नोकरी किंवा रोजमजुरीचे काम करीत असल्यास ५००/- ते ७००/- रूपये रोजमजुरीने काम करीत असावा असे गृहीत धरता येईल. त्यामुळे गैरअर्जदार नसिब याचे दरमहा उत्पन्न कमीत कमी १५,०००/- ते २०,०००/- असल्याचे गृहीत धरने उचीत होईल. गैरअर्जदार नसिब याने त्याचे जबाबात त्याचेवर इतर कोणाची जबाबदारी असल्याचे नमुद केलेले नाही. त्यामुळे त्याचेवर केवळ अर्जदार दिपाली व त्याची नवजात मुलगी यांचेच पालणपोषनाची जबाबदारी आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते. अर्जदाराचे विव्दान वकीलांनी युक्तीवाद केला की, पत्नी ही काहीतरी कमवत आहे केवळ या कारणास्तव तिला पोटगी नाकारता येत नाही. त्यांचे सदर कथनाचे पुष्ठयर्थ अर्जदाराचे वकीलांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे ***संजय दामोदर काळे -वि- कल्याणी संजय काळे (कि. रिव्हीजन अर्ज क १६४/२०१९ न्यायनिर्णय दिनांक २५/०५/२०२०)*** या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली. गैरअर्जदाराने त्याचे जबाबात अर्जदार दिपाली हि उच्चशिक्षीत असल्याने कमविण्यास सक्षम

असल्याचे म्हटले असले तरी ति आज रोजी कमवती आहे असे त्याचे म्हणने नाही. त्यामुळे सदर न्यायनिर्णयाची मदत अर्जदारास या प्रकरणात होउ शकत नाही. वर नमुद विवेचनावरून गैरअर्जदार नसिब हा कमविण्यास सक्षम असल्याचे गृहीत धरता येत असल्याने व अर्जदार दिपाली तसेच त्याची नवजात मुलगी यांचे पालनपोषण करण्याची नैतीक व कायदेशिर जबाबदारी त्याची असल्याने त्याचे प्रथम दर्शनी दिसुन येणा-या उत्पन्नाचा विचार करता त्याने अर्जदार दिपाली हिला दरमहा ४,०००/- रूपये व त्याचे नवजात मुलीस दरमहा २,०००/- रूपये अंतरीम खावटी देणे उचीत होईल. सबब मी मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष येणेप्रमाणे नोंदविला आहे.

**मुददा क्र.३ व ४ ची कारणे :**

१२) अर्जदार दिपाली हिने तिचे अर्जात तिला व तिचे मुलीला नागपुर येथे राहण्यासाठी गैरअर्जदार नसिब याने तो राहत असलेल्या घराप्रमाणे स्वतंत्र व्यवस्था करून द्यावी किंवा घरभाडयापोटी दरमहा २५,०००/- रूपये द्यावे असा आदेश करण्याची विनंती केली आहे. अर्जदाराने तिचे मुळ अर्जात ति गैरअर्जदार याचे सोबत प्लॉट क्र.६२, लक्ष्मी नारायण कॉलनी, रिंगरोड, खरबी नागपुर -४४००३४ या ठीकाणी राहत होती असे नमुद केले आहे. गैरअर्जदार नसिब याने सदर बाब त्याचे जबाबात मान्य केली असुन अर्जदार व तिचे मुलीसाठी तो सदर घरात वेगळी व्यवस्था करण्यास तयार असल्याचे त्याचे म्हणने आहे. परंतु अर्जदार माहेरी राहत असतांना देखिल गैरअर्जदार याने तिचे माहेरी येउन तिचे वडीलांसोबत भांडन केल्याचे अर्जदाराचे कथन आहे. जरी सदर बाब आज रोजी पुराव्याअभावी सिध्द झालेली नसली तरी देखील त्यात तथ्य असल्यास व अर्जदारास नागपुर येथेच वेगळी व्यवस्था करण्याचा आदेश केल्यास गैरअर्जदाराव्दारे परत अर्जदारास त्रास होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अर्जदार हिने प्रस्तुत प्रकरणाचा निकाल लागेस्तोवर माहेरी

माथनी, तालुका मौदा येथेच राहणे उचीत होईल. माथनी येथे तिला वेगळे भाडयाचे खोलीत राहावयाचे असल्यास ति व तिची मुलगी राहणार असे गृहीत धरून व माथनी हे ग्रामीण ठिकाण असल्याने अर्जदारास राहण्यासाठी दरमहा १५००/- रूपये भाडयाने अर्जदारास सहज घर मिळु शकते. त्यामुळे मि मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे. तसेच अर्जदार तिचे माहेरी वडीलांकडे राहत असतांना किंवा वेगळी भाडयाचे घरात राहत असतांना गैरअर्जदाराने तिला कोणताही त्रास देउ नये या करीता अर्जदारासाठी सौंरक्षणात्मक आदेश पारीत करणे देखील गरजेचे असल्याने मि मुद्दा क्र. ४ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुददा क्र.५ ची कारणे</u> :**

१३) अर्जदार हिने तिला दर तारखेवर न्यायालयात हजर राहण्यासाठी प्रत्येक तारखेस रूपये १०००/- प्रमाणे रक्कम गैरअर्जदाराकडुन मिळावी तसेच वकीलांचे फि करीता ८०,०००/- रूपये मिळावे अशी विनंती केली आहे. वर नमुद कारणास्तव अर्जदार हिने प्रकरणाचा निकाल लागेस्तोवर मौदा येथेच राहने उचित होत असल्याने ति माथनी येथेच राहणार हे गृहीत धरून तिला प्रवासखर्च मंजुर करणे उचीत होत नाही. तसेच अर्जदार हिला वकीलांची फि भरणे शक्य होत नसल्यास तिला लिगल एड मार्फत मोफत/सरकारी खर्चाने वकील मिळु शकतात. त्यामुळे या क्षणी वकीलांचे फि चा भार गैरअर्जदारावर देणे उचित होत नसल्याने मि मुद्दा क्र.५ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

१४) वरील संपुर्ण विवेचनावरुन अर्जदार दिपाली ही गैरअर्जदार नसिब यांच्याशी कौटुंबीक संबंधात असल्याने तसेच प्रस्तुत अर्जावरुन अर्जदार दिपाली वर कौटुंबीक हिंसाचार झाल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येत असल्याने कलम २३ कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ मधील

तरतुदीनुसार अर्जदार दिपाली ही तात्पुरती मासिक खावटी, घरभाडे व सौंरक्षण आदेश मिळण्यास हक्कदार आहे. म्हणुन मुददा क्र.६ च्या अनुषंगाने खालील आदेश पारीत.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज अंशत: मंजूर

२. गैरअर्जदार नसिब याने अर्जदार दिपाली व तिचे मुलीसाठी एकत्रित रूपये ६०००/- (रुपये सहा हजार फक्त) प्रति महिना तात्पुरती खावटी अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दि. २२/१०/२०२० पासून ते मुख्य अर्जावर निर्णय लागेस्तोवर दयावे.

३. गैअर्जदार नसिब याने अर्जदार दिपाली हिला माथनी येथे भाडयाचे घरात राहण्यासाठी रूपये १५००/- दरमहा अर्ज दाखल तारखेपासुन म्हणजेच दिनांक २२/१०/२०२० पासुन ते मुख्य अर्जावर निर्णय लागेस्तोवर द्यावे.

४. गैरअर्जदार नसिब याने अर्जदार हिला कोणत्याही प्रकारचा शारीरीक किंवा मानसिक त्रास देउ नये असा सौंरक्षणात्मक अंतरीम आदेश पारीत करण्यात येत आहे.

५. सदर आदेशाची प्रत संरक्षण अधिकारी व संबंधित पोलीस ठाणे अधिकारी यांना पाठविण्यात यावी.

६. आदेशाची प्रत दोन्ही पक्षास मोफत दयावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित.)

( एस.पी.वानखडे )
न्यायदंडाधिकारी (प्र. श्रेणी),
मौदा, ता.मौदा, जि. नागपुर.

दि.०४/०८/२०२१

**Endorsement**

| | | |
|---|---|---|
| Case argued on | : | 26.03.2021 |
| Order dictated on | : | 04.08.2021 |
| Transcription ready on | : | 04.08.2021 |
| Order checked and signed on | : | 04.08.2021 |
| Path way of the Stenographer | : | /home/ubuntu/Desktop/S.P. Wankhade/Interim Maintenance (Marathi)/ |

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File are same word to word as per original judgment.

Name of Steno :- R.K. Shriwastava.